# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट ४०३-२०२४** **दिनांक :- २८/१०/२०२४**

## "बनावट Invesment App मध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन फसवणुक केलेली २,००,११२/- रु तक्रारदार यांना परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश"

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील अर्नाळा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार नामे श्री. भट्टाचार्य यांनी ऑनलाईन शेअर ट्रेंडिग करुन अधिक रक्कम मिळत असल्याने बनावट Invesment App मध्ये रक्कमेची गुंतवणुक केली. परंतु तक्रारदार यांना कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणुक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने तात्काळ तक्रारी अर्जाची नोंद घेतली तसेच ऑनलाईन **NCCRP Portal** वर तक्रार नोंदविण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे येथे अर्ज आवक क्रमांक १९८७ -बी/२०२४)**

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका सादर केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा.न्यायालय यांचेकडे पाठपुरावा करुन **तक्रारदार यांची फसवणुक झालेली २,००,११२/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

## अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, सफौ/मिलाग्रिस फर्नांडिस, पोअं/ सावन शेवाळे, पोअं/प्रशांत बोरकर, मपोहवा/माधुरी धिंडे सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

**----0000---**